पुण्यनगरी पु. घा. ७.

# मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तपदी मधुकर पांडे

। मीरा रोड : मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या आयुक्त पदावर मधुकर पांडे यांची मंगळवारी नियुक्ती करण्यात आली. नियुक्ती झाल्यानंतर मधुकर पांडे यांनी बुधवारी आयुक्तपदाचा पदभार स्वीकारला आहे. सध्याचे पोलीस आयुक्त सदानंद दाते यांची अपर पोलीस महासंचालक दहशतवाद विरोधी पथकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय २०२० मध्ये स्थापन झाल्यापासून आयुक्तपदी सदानंद दाते यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यांच्यापुढे गुन्हेगारी रोखण्याचे मोठे आव्हान होते. नागरिकांच्या सुरक्षतेच्या हेतूने



अनेक चांगल्या उपाययोजना राबवल्या. शहरातील गुन्हेगारीच्या प्रमाणातदेखील मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. आयुक्तांनी पहिल्या दोन वर्षांत कायदा आणि सुव्यवस्था सांभाळली, तर गुन्हेगारी रोखली. समाजात व प्रशासनामध्ये बदल आणि सुधारणा करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. सदानंद दाते यांनी दहशतवाद विरोधी पथक महासंचालक पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर तेथील परिस्थितीची माहिती घेत कामाला सुरुवात करण्यात येणार असून, मुंबई दहशतवाद मुक्त ठेवण्याचा प्रयत्न करणार असल्याचे दाते यांनी सांगितले. दाते यांच्या जागी मधुकर पांडे यांची मंगळवारी नियुक्ती करण्यात आली. पांडे यांनी बुधवारी दुपारी ४ च्या सुमारास पोलीस आयुक्त पदाचा पदभार स्वीकारला आहे. पांडे हे अपर पोलीस महासंचालक, मुंबई या पदावर होते. त्यामुळे आता नव्याने नियुक्त झालेले पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांच्या कामाकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.

पुढारी पु. पा-२.

# तलावावर दिवे लावण्याऐवजी रुग्णालयाला सुविधा पुरवा

**नालासोपारा : पुढारी वृत्तसेवा**

विरार- वसई-विरार महापालिकेने मॅरेथॉन स्पर्धेसाठी एका दिवसात अडीच कोटींचा धुरळा केल्यानंतर विकासकामांच्या नावाखाली आयुक्त पुन्हा एकदा साडेसहा कोटींचे दिवे उजळले जाणार असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. पालिकेच्या रुग्णालयात एमआरआय, सिटीस्कॅन, सुविधा पुरवण्यासाठी महापालिकेकडे निधी नाही. मग लोकांच्या आरोग्यापेक्षा दिवे लावणे इतके महत्वाचे आहे का? असा सवाल भाजपचे नालासोपारा मंडळ सचिव समीर निकम यांनी उपस्थित केला आहे.

वसई-विरार महापालिका क्षेत्रातील चार उद्यानांतील रंगीबेरंगी ऑर्किटेक्चरल प्रकाशव्यवस्थेसाठी तब्बल ६ कोटी ७५ लाख ५४ हजार ३३ रुपये खर्च करण्याचा निर्णय वृक्ष प्राधिकरण विभागाच्या माध्यमातून घेण्यात आला आहे. वसई-विरार महापालिका मॅरेथॉन स्पर्धा ११ डिसेंबर रोजी पार पडली. या स्पर्धेच्या बक्षीस आणि आयोजनावर दरवर्षीपेक्षा जास्त पैसे उधळण्यात आल्याने ही स्पर्धा चर्चेचा विषय बनली आहे.

वर्षभर पालिका शहरातील रस्त्यांकडे दुर्लक्ष करते, मात्र मॅरेथॉन स्पर्धेचा मार्ग कोट्यवधी रुपये खर्च करून सुसज्ज करते. हीच तत्परता अन्य वेळीही का दाखवली जात नाही? असा प्रश्न करत वसई-विरारकरांनी आयुक्तांना धारेवर धरले होते. या एकदिवसीय स्पर्धेसाठी पालिकेने अडीच कोटींचे बजेट ठेवले होते. मॅरेथॉन स्पर्धेची राळ खाली बसत नाही; तोच विकासकामांच्या नावे पुन्हा एकदा दिवे लावण्याचा निर्णय घेतल्याने आयुक्तांवर टीकेचा भडिमार होत आहे.

लोकमत पा.नं.१.

# सीमावादावर दोन्ही राज्यांच्या तीन-तीन मंत्र्यांची समिती

## गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत मुख्यमंत्र्यांची चर्चा सकारात्मक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** महाराष्ट्र आणि कर्नाटक यांच्यातील सीमावाद पुन्हा उफाळून आलेला असताना बुधवारी रात्री नवी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत बैठक झाली. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यावेळी उपस्थित होते. याप्रकरणी तोडगा काढण्यासाठी अमित शहा यांनी सहा मंत्र्यांची समिती स्थापन केली असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नंतर दिली.

बैठकीनंतर अमित शहा म्हणाले की, गृहविभागातील अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत चांगल्या वातावरणात ही चर्चा झाली. दोन्ही राज्यांच्या वतीने प्रत्येकी तीन याप्रमाणे सहा मंत्र्यांमध्ये बैठक होईल. दोन्ही बाजूंकडील कायदा व सुव्यवस्थेची काळजी घेतली जावी. प्रवासी, व्यापारी यांना त्रास होऊ नये, यासाठी दोन्ही बाजूंनी आयपीएस अधिकारी नेमण्याची तयारी दाखविण्यात आली.



बैठकीवेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.

### सीमावादात केंद्राचा प्रथमच हस्तक्षेप : फडणवीस

- अमित शहा यांनी ही बैठक घेतल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समाधान व्यक्त केले, तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, केंद्र सरकारने दोन्ही राज्यांचे म्हणणे ऐकून घेतले.
- सीमावादात केंद्राने प्रथमच हस्तक्षेप केला आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी केलेले वादग्रस्त वक्तव्य आणि ट्वीटनंतर सीमा प्रश्न चिघळला होता. यावर बोम्मई यांनी असे स्पष्ट केले की, ते माझे वक्तव्य नव्हते. ते ट्विटर हँडल माझे नाही.

### बैठकीत काय ठरले?

- सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयापर्यंत कोणतेही राज्य एकमेकांच्या भूभागावर दावा सांगणार नाही.
- दोन्ही बाजूचे तीन-तीन याप्रमाणे सहा मंत्री या मुद्द्यावर चर्चा करतील.
- मोठ्या नेत्यांच्या नावे बनावट ट्विटर खाती तयार करून अफवा पसरविल्या गेल्या. अशा बनावट खात्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला जाईल.
- लोकांचे हित पाहता यावरून राजकारण केले जाऊ नये.

दोन्ही बाजूंनी बैठकीत सकारात्मक भूमिका मांडण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची वाट पाहावी. काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना (उद्धव ठाकरे गट) या प्रकरणात सहकार्य करील, अशी अपेक्षा आहे.

- अमित शहा, गृहमंत्री

# छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान करणाऱ्यांविरोधात का बोलत नाहीत?

## वारकरी संप्रदायाच्या नेत्यांना संजय राऊत यांचा सवाल

← पुण्यनगरी पा.नं.३.

**नाशिक :** वारकरी संप्रदायाविषयी केलेल्या वक्तव्यावरून टीकेच्या धनी बनलेल्या शिवसेनेच्या ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांची खा. संजय राऊत यांनी पाठराखण केली आहे. वारकरी संप्रदायाचे नेते छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान करणाऱ्या राज्यपाल आणि भाजप नेत्यांविरोधात का बोलत नाहीत, असा सवाल राऊत यांनी केला आहे. महापुरुषांचा अवमान करणाऱ्यांविरोधात आधी कारवाई करा, नंतर भूतकाळातील मढी उकरून काढा, असे आव्हानही राऊत यांनी दिले. नाशिक दौऱ्यावर असताना ते बोलत होते.



खा.राऊत म्हणाले की, शिवसेना सातत्याने वारकरी संप्रदायासोबत राहिलेली आहे. कधीही वारकरी संप्रदायाचा अवमान केला नाही व करणारही नाही. या प्रकरणी वारकरी संप्रदायाच्या प्रमुख नेत्यांशी आमची चर्चा सुरू आहे.

स्वतः सुषमा अंधारे यांनी भूमिका मांडली आहे. साधुसंत, महंत यांच्या विषयीची आमची भूमिका म्हणजे ढोंग नाही. आमची श्रद्धा आहे. अंधारे ज्या पद्धतीने महाराष्ट्रात शिवसेनेची भूमिका मांडत फिरत आहेत, ढोंगीपणावर ज्या पद्धतीने प्रहार करत आहेत, ते बघता त्यांच्या मागच्या भूमिकांबाबत उगाच प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे, असे नमूद करत राऊत यांनी अंधारे यांची पाठराखण केली. येत्या १७ डिसेंबर रोजी महामोर्चा निघेल, हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा मोर्चा असेल व त्यामध्ये आम्ही आघाडीचे नेते सहभागी होऊ, असेही राऊत यांनी सांगितले. कोणत्याही धर्मातील महिला, मुलींवर अत्याचार होणे अयोग्य असल्याचे सांगत लव्ह जिहाद कायद्याविषयी राऊत यांनी मत मांडले. तसेच सीमावादात गृहमंत्री अमित शाह यांनी लक्ष घातले पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येत नाही, तोपर्यंत बेळगावात केंद्र शासनाने सुरक्षा द्यावी, असे राऊत म्हणाले.

लोकसत्ता पु-पा-१.

# 'मेट्रो ९' कारशेडबाबत संभ्रम कायम

## पर्यायी जागेचा विचार करणार असल्याचे मुख्यमंत्र्याचे वक्तव्य

**लोकसत्ता वार्ताहर**



**भाईंदर :** भाईंदर पश्चिम येथील राई-मुर्धे गावात 'मेट्रो ९' चे कारशेड प्रकल्पाबाबत पर्यायी जागेचा विचार करणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी येथील एका कार्यक्रमात सांगितल्यामुळे कारशेडबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. कारशेड उभारण्याचे जवळजवळ नक्की झाले असून नागरिकांचा विरोधही तीव्र होऊ लागला आहे. अशा परिस्थितीत मुख्यमंत्र्यांच्या एका कार्यक्रमातील वक्तव्याने मोठा संभ्रम निर्माण झाला आहे.

मीरा-भाईंदर मेट्रो मार्गिका ९ चे काम गेल्या अडीच वर्षांपासून प्रगतिपथावर सुरू आहे. या मेट्रो मार्गिकेसाठी आवश्यक असलेल्या कारशेडची जागा भाईंदर पश्चिम येथील राई-मुर्धे गावालगत ८७ एकरांत एमएमआरडीएने निश्चित केली आहे. शेतजमिनींच्या जागेवर कारशेड केल्यामुळे स्थानिक शेतकरी उदध्वस्त होणार आहे. तसेच मेट्रो मार्गामुळे शेकडो वर्षे जुनी घरे तुटणार आहेत, त्यामुळे त्यास विरोध करत येथील ग्रामस्थांनी मेट्रो व कारशेडविरोधात आंदोलन सुरू केले आहे. १७ ऑक्टोबर रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ग्रामस्थांसोबत चर्चा करण्यासाठी विशेष बैठक बोलावली होती. यावेळी कारशेड हे राई-मुर्धे गावात न उभारता तेथून जवळ असलेल्या खोपरा गावाजवळ उभारावे अशी मागणी ग्रामस्थांनी केली होती. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनीदेखील खोपरा येथील जागेचे सर्वेक्षण करून अहवाल सादर करण्याचे आदेश एमएमआरडीएला दिले होते. त्यानुसार अहवाल नुकताच मुख्यमंत्र्यांना सादर केला होता. यात खोपरा येथे मेट्रो कारशेड उभारल्यास शासनाला मूळ कारशेडच्या दुप्पट खर्च उचलवा लागणार असल्याचे नमूद करण्यात आले होते. त्यामुळे अधिकचा खर्च उचलावा लागु नये म्हणून मेट्रो कारशेड त्याच ठिकाणी ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

अशा परिस्थिती सोमवारी कला महोत्सवाच्या कार्यक्रमात आमदार प्रताप सरनाईक यांनी भाषणात मेट्रोचा मुद्दा नागरिकांच्या दृष्टीने मार्गी लावावा, अशी मागणी केली. यावर ग्रामस्थांच्या मागणीला गांभीर्याने घेत मेट्रो कारशेड प्रकल्प पुढे स्थलांतरित करण्यासाठी योग्य निर्णय घेऊ, अशी घोषणा मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली होती. यामुळे कारशेडसंदर्भात शासनाची नेमकी भूमिका काय? असा संभ्रम स्थानिक ग्रामस्थांमध्ये निर्माण झाला आहे.

सकाळ पु-पा-१.



**नालासोपारा :** मारहाण करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी, या मागणी करण्यासाठी महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी विरार पोलिस ठाण्याबाहेर गर्दी केली होती.

# विरारमध्ये महावितरणच्या कर्मचाऱ्याला मारहाण

नालासोपारा, ता. १४ (बातमीदार) : विरारमध्ये महावितरणाच्या दोन कर्मचाऱ्यांना बुधवारी लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करण्यात आली आहे. विरार पूर्वेच्या मन्सूर नगर येथील अलसीफा मंजीलजवळ सकाळी वीज चोरी करणाऱ्यांवर कारवाई करत असताना ही घटना घडली आहे. याबाबत विरार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गणेश गवसकर, भास्कर चौधरी अशी मारहाण झालेल्या महावितरण कर्मचाऱ्यांची नावे आहेत; तर मस्तान उस्मान शेख असे मारहाण करणाऱ्या आरोपीचे नाव आहे. विरार पूर्वेच्या गोपचर पाडा, मन्सूर नगर अलसीफा मंजील या परिसरात वीज चोरी होत असल्याची माहिती महावितरणच्या अधिकाऱ्यांना मिळाली होती. त्या अनुषंगाने महावितरण कर्मचारी गणेश गवसकर, भास्कर चौधरी हे कारवाई करण्यासाठी गेले असता, आरोपी मस्तान उस्मान शेख याने कर्मचारी यांना धमकावून, लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

लोकसत्ता ५.५.२०

# नायगाव उड्डाणपुलावर पुन्हा अंधारयात्रा

## देखभाल दुरुस्ती नसल्याने पथदिवे बंद

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई :** काही दिवसांपासून नायगाव पूर्व आणि पश्चिमेला जोडणाऱ्या उड्डाणपुलावरील पथदिवे बंद पडले आहे. त्यामुळे रात्रीच्या सुमारास वाहनचालकांना अंधारयात्रा करावी लागत असून या अंधारामुळे अपघात होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

नायगाव वसईचा परिसर महामार्गाला जोडण्यासाठी नायगाव पूर्व व पश्चिमेला जोडणाऱ्या उड्डाणपुलाचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) ने पूर्ण करून मागील काही महिन्यांपासून हा पूल वाहतुकीला खुला केला आहे. यामुळे वसईसह महामार्ग आणि पूर्व पश्चिम प्रवासाचे अंतर कमी झाले असून नागरिकांना याचा मोठा फायदा झाला आहे.

या पुलावरून रात्रीच्या सुमारास ही नागरिकांना सुलभ व सुरक्षित प्रवास करता यावा यासाठी पथदिवे लावण्यात आले आहेत. मात्र या पथदिव्यांची योग्य ती देखभाल दुरुस्ती होत नसल्याने सातत्याने पथदिवे बंद अवस्थेत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

मागील काही दिवसांपासून हे पथदिवे बंद असल्याने रात्रीच्या सुमारास येथून प्रवास करताना वाहनचालकांना अडचणी निर्माण होत आहेत. एखाद्या वेळेस पुलाचा अंदाज न आल्यास अपघात घडू शकतो. तर काही वेळा पुलाच्या दोन्ही बाजूच्या कडेला अनेक वाहने थांबवून उभे राहत असतात. अशा वेळी वाहन दिसून न आल्यास धडक लागून अपघात घडू शकतो. यासाठी एमएमआरडीए मार्फत या पुलावरील पथदिवे दुरूस्त करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.



### उड्डाणपुलावर मद्यपींचा वावर

नायगाव उड्डाण पूल वाहतुकीला खुला झाला आहे. मात्र वाहतूक कोंडी व इतर समस्या लक्षात घेता एक मार्गिका अजूनही सुरू केली नाही. त्या मार्गिकेवर आता मद्यपींचा वावर अधिक प्रमाणात वाढला आहे. रात्रीच्या सुमारास काही गर्दुल्ले पुलावरच मद्यपान करण्यासाठी बसतात. काही वेळा सोबत आणलेल्या मद्याच्या बाटल्या फोडून त्या ठिकाणी टाकतात तर इतर कचरा टाकणे लघुशंका करणे अशा प्रकारामुळे पुलावर कचऱ्याचे साम्राज्य तयार होत आहे. या अशा प्रकाराला आळा घालण्यासाठी कारवाई करण्याची मागणी नागरिकांमधून करण्यात येत आहे.

---

# तनिष्काचा मृत्यू महापालिकेच्या चुकीमुळे

← सकाळ ५.५.१.

विरार, ता. १४ (बातमीदार) : तनिष्का कांबळे हिचा मृत्यू वसई-विरार महापालिकेने रस्ता खोदल्यानेच झाला, असे महावितरणकडून उच्च न्यायालयात सांगण्यात आले. या प्रकरणावर मुंबई उच्च न्यायालयात मंगळवारी सुनावणी झाली.

तनिष्का कांबळे मृत्यू प्रकरणी न्यायालयाने महावितरण व वसई-विरार महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांना सुनावणीला उपस्थित राहून म्हणणे मांडण्याचे आदेश दिले होते. महावितरणने ही घटना वसई-विरार महापालिकेने रस्ता खोदल्यामुळे झाल्याचे म्हटले आहे. या प्रकरणात महापालिका तर दोषी आहेच; पण महावितरणनेही चुकीच्या पद्धतीने विद्युतवाहिनी टाकल्याने तनिष्का कांबळे हिला जीव गमवावा लागला आहे.

म. टा. पु. पा. ७.

# 'ब्रेक वॉटर'चे काम बंद


## उत्तन येथील मच्छिमारांकडून प्रकल्पात फेरबदलांची मागणी

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

उत्तन बंदरावर ब्रेक वॉटर (जलभंजक) उभारण्याचे काम मागच्या काही महिन्यापासून बंद पडले आहे. या प्रकल्पात काही फेरबदल करण्याची मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे. त्याला संबंधित विभागाची परवानगी न मिळाल्याने, हे काम अर्ध्यावर रोखण्यात आल्याचे सांगितले जात आहे. समुद्राच्या लाटांमुळे मच्छिमारांच्या बोटींचे होणारे नुकसान टाळण्यासाठी हा ब्रेक वॉटर उभारला जात आहे.

भाईंदर पश्चिमेचा उत्तनच्या समुद्रालगत मोठ्या प्रमाणावर मच्छिमारांचे वास्तव्य आहे. येथील स्थानिक मच्छिमार मासेमारी करून परतल्यानंतर, बोटी किनाऱ्यावर उभ्या करतात. त्यावेळी समुद्राच्या थेट लाटांमुळे बोटींचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. यासह बोटींचे इंजिन व इतर कोणतीही दुरुस्ती करायची असल्यास अडथळा येतो. त्यामुळे उत्तनच्या स्थानिक मच्छिमारांनी या बंदरावर ब्रेक वॉटर उभारण्याची मागणी केली होती. दगडांची रास टाकून उभारल्या जाणाऱ्या ब्रेक वॉटरमुळे लाटांचा तडाखा कीह प्रमाणात कमी होतो. तसेच बोटी सुरक्षितपणे उभ्या करणे तसेच त्यांची दुरुस्ती करणे शक्य होते.

उत्तन बंदरावर ब्रेक वॉटर उभारण्यासाठी राष्ट्रीय कृषी योजनेअंतर्गत ४४ कोटींचा निधी उपलब्ध झाला. त्यानंतर मार्च २०२१मध्ये हे काम मेरीटाइम बोर्डाकडून हाती घेण्यात आले. त्यानंतर मंजूर नकाशानुसार, वसई बाजूच्या किनारपट्टीच्या दिशेला ब्रेक वॉटर उभारण्याचे काम पूर्ण झाले आहे, तर गोराईच्या बाजूला काम हाती घेतल्यानंतर ब्रेक वॉटर हा किनाऱ्याच्या बाजूला न घेता तो समुद्राच्या दिशेला पुढे घेण्यात यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. यासह काही ठिकाणी बोटी आत-बाहेर नेण्या-आणण्यासाठी जागा ठेवण्याची मागणीही केली जात आहे. या पार्श्वभूमीवर, हे काम मागच्या सुमारे दोन महिन्यांपासून बंद आहे.



### प्रस्ताव सादर

याबाबत, खासदार राजन विचारे यांना विचारले असता, प्रकल्पात काही बदल करायचे असल्याने काम थांबवण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. तर 'ब्रेक वॉटरच्या निश्चित केलेल्या कामात स्थानिक रहिवाशांच्या मागणीनुसार काही बदल करण्यासाठी संबंधित विभागाला प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. त्याला मंजुरी मिळाल्यानंतर तात्काळ काम सुरू केले जाणार आहे,' असे काम पाहणाऱ्या कंत्राटदाराने सांगितले.

लोकसत्ता पु. पा. ४.

# विविध मागण्यांसाठी पालिकेवर शिवसेनेचा मोर्चा

लोकसत्ता वार्ताहर

**वसई :** शहरात नियमित पाणीपुरवठ्याच्या हमीसह रस्त्यांची दुरवस्था आणि आरोग्य व्यवस्थेतील अनागोंदी दूर करण्यासाठी शिवसेनेच्या वतीने (उद्धव बाळासाहेब ठाकरे) मंगळवारी पालिकेवर धडक मोर्चा काढण्यात आला. नागरिकांना मुबलक पाणी नाही. याबाबत तक्रारी करूनही पालिकेकडून यावर तोडगा काढण्यात आलेला नाही. पालिकेकडे नळजोडण्या मिळण्यासाठी अर्ज दाखल झाले आहेत. अर्जदारांना अद्याप नळजोडण्या मिळालेल्या नाहीत. नळजोडण्या मिळालेल्यांना मुबलक पाणी मिळत नाही. पाच ते सहा हजार नळ जोडणीसाठीचे अर्ज प्रलंबित आहेत. पालिकेचे अधिकारी केवळ ठरावीक लोकांनाच नळजोडण्या देत आहेत. पालिका आयुक्तांनी नळजोडणीसाठी आलेल्या अर्जाबाबत आराखडा तयार करावा. त्यात ज्यांचे अर्ज पहिले आले आहेत, त्यांना आधी नळजोडणी द्यावी अशी मागणी जिल्हाप्रमुख पंकज देशमुख यांनी केली आहे. यासह इतर समस्याही पालिकेने तातडीने सोडवाव्यात अशी मागणी करण्यात आली. अतिरिक्त आयुक्त रमेश मनाळे, उपायुक्त डॉ. किशोर गवस व विविध विभागाचे अधिकारी व शिवसेना पदाधिकारी यांचे शिष्टमंडळ यांच्यात झालेल्या चर्चेनंतर मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन देण्यात आले.

पुढारी पा.नं.५.

# परिवहन सेवा चालविण्यासाठी शिंदे गटातील नेत्याचा आटापिटा

## नवीन ठेका काळ्या यादीतील कंपनीला मिळण्यासाठी प्रयत्न

भाईंदर : राजू काळे

मिरा-भाईंदर महापालिकेची स्थानिक परिवहन सेवा २०१० मध्ये रॉयल्टीच्या माध्यमातून चालविणाऱ्या मेसर्स केस्ट्रल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. या कंपनीला प्रशासनाने काळ्या यादीत टाकल्यानंतर पुन्हा याच कंपनीला परिवहन सेवेचा नवीन ठेका मिळवून देण्यासाठी शिंदे गटातील एका स्थानिक नेत्याचा आटापिटा चालला आहे. त्याची निविदा याच कंपनीला मिळावी, यासाठी प्रशासनावर थेट मंत्रालयावरून दबावतंत्राचा वापरही केला जात असल्याचे सूत्राकडून सांगण्यात आले.

### मंत्रालयातून दबाव तंत्राचा वापर

पालिकेने काळ्या यादीत टाकलेल्या मेसर्स केस्ट्रल कंपनीसाठी शिंदे गटातील एका स्थानिक नेत्याचा समावेश असून त्यासाठी प्रशासनावर थेट मंत्रालयाकडून दबाव तंत्राचा वापर केला जात असल्याचे सूत्राकडून सांगण्यात आले. तर मेसर्स महालक्ष्मी इंफ्राप्रोजेक्ट्स एलएलपी या कंपनीसाठी भाजपच्या एका नेत्याने फिल्डिंग लावली आहे. तसेच हि सेवा तात्पुरत्या स्वरूपात चालविणाऱ्या तिसऱ्या ठेकेदारालाच मिळावी, यासाठी भाजपच्याच एका गटातील नेत्यांनी सुपारी घेतल्याचे बोलले जात आहे. यामुळे पालिकेची परिवहन सेवा प्रवासीभिमुख ऐवजी राजकीय रंगातील टक्केवारीभिमुख ठरत असल्याचा आरोप होऊ लागला आहे. मात्र यावर आयुक्त दिलीप ढोले कोणती भूमिका घेणार, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.



पालिकेने २००५ मध्ये स्थानिक परिवहन सेवा सुरु केली. त्यासाठी पालिकेने स्वखर्चातून ५० नवीन बस खरेदी केल्या. त्याचा ठेका मेसर्स महालक्ष्मी ट्रान्सपोर्ट या कंपनीला देण्यात आला. त्यात राजकीय वाटमारी सुरु झाल्याने पालिकेला लाखोंचा तोटा होऊ लागला. त्यामुळे पालिकेने ९ ऑक्टोबर २०१० रोजी हि सेवा मोडीत काढून खाजगी-लोक सहभाग (पीपीपी) तत्वावरील रॉयल्टीच्या माध्यमातून उत्पन्न देणारी सेवा सुरु केली. त्याचा ठेका मेसर्स केस्ट्रल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. या कंपनीला देण्यात आला. त्यावेळी पालिकेने केंद्र शासनाच्या तत्कालिन जेएनएनयुआरएम योजनेंतर्गत पहिल्या टप्प्यात ५० बस खरेदी केल्या. नवीन ५० व जुन्या ठेक्यातील ५० अशा एकुण १०० बसची सेवा ठेकेदाराकडून सुरु करण्यात आली. या सेवेंतर्गत ठेकेदाराकडून पालिकेला प्रती किलो मीटर मागे १ रुपये रॉयल्टी देण्याचे निश्चित करण्यात आले. दरम्यानच्या काळात काही तांत्रिक कारणास्तव या सेवेच्या तोट्यात वाढ होऊन जुन्या बस भंगारात गेल्या. यामुळे अपुऱ्या बस संख्येवर सेवा हाकण्यास सुरुवात होऊन ठेकेदाराकडील रॉयल्टीची थकबाकी वाढली. तसेच ही सेवा असमाधानकारक ठरल्याने प्रवासी, कामगार व प्रवासी संघटनांच्या तक्रारी वाढल्या. अखेर पालिकेने ही सेवा २५ नोव्हेंबर २०१५ रोजी बंद करून ती तात्पुरत्या स्वरूपात चालविण्यासाठी मेसर्स सोनावणे अँड कंपनी ला नियुक्त केले. सेवा बंद करून कंपनीला काळ्या यादीत टाकले. कंपनीने, पालिकेने खरेदी केलेल्या ५० बसवर मालकी हक्क दाखवून त्या बस आपल्या ताब्यात देण्याची मागणी केली. पालिकेने त्यावर लवादाची नियुक्ती केली. लवादाचा निर्णय अद्यापही प्रलंबित आहे. दरम्यान केंद्र शासन व जागतिक बँकेच्या निर्देशानुसार ग्रॉस कॉस्ट कॉन्ट्रॅक्ट (जीसीसी) अथवा नेट कॉस्ट कॉन्ट्रॅक्ट (एनसीसी) तत्वावर चालविण्याचा निर्णय पालिकेकडून घेण्यात आला.

२०१७ मधील सर्व गटनेत्यांच्या बैठकीत ही सेवा नेट कॉस्ट कॉन्ट्रॅक्ट विथ व्हायबल गॅप फंडींग तत्वावर चालविण्याचा निर्णय घेण्यात आला. १ ऑगस्ट २०१९ रोजी त्याचा ठेका मेसर्स भागीरथी एमबीएमटी ट्रान्सपोर्ट प्रा. लि. या कंपनीला देण्यात आला. त्यात पुन्हा राजकीय टक्केवारीचा शिरकाव झाल्याने सेवेला ग्रहण लागण्यास सुरुवात झाली. याखेरीज कोव्हीड लॉकडाऊन कालावधीतील रक्कम करारानुसारच देण्याची मागणी कंपनीकडून करण्यात आली. तसा ठराव तत्कालीन परिवहन समितीच्या बैठकीत मंजूर करण्यात आला. पालिकेने हा मंजूर ठराव शासनामार्फत रद्द करून घेतला. तसेच कंपनीला सेवा सुरु करण्याचे आदेश देऊनही कंपनीने सेवा सुरु न केल्यामुळे पालिकेने ही सेवा ५ ऑक्टोबर २०२० रोजी बंद केली. यानंतर या सेवेचा ठेका तात्पुरत्या स्वरूपात २००५ मध्ये देण्यात आलेल्या कंपनीला देण्यात आला. या कंपनीचे सध्याचे नाव मेसर्स महालक्ष्मी इंफ्राप्रोजेक्टस एलएलपी असे असून या कंपनीचे कंत्राट अद्यापही सुरु आहे. अलिकडेच पालिकेने केंद्र शासनाच्या १५ व्या वित्त आयोगाकडून प्राप्त निधीतून ४५ इलेक्ट्रीक बस खरेदी केल्या आहेत. या बससह सध्याच्या इंधनावरील बस चालविण्यासाठी पालिकेने जीसीसी तत्वावर सेवा चालविण्यासाठी दोन स्वतंत्र निविदा काढल्या. यातील इलेक्ट्रिक बसच्या निविदेची मुदत १४ डिसेंबर रोजी तर इंधनावरील बसच्या निविदेची मुदत २१ डिसेंबर रोजी संपणार आहे. त्याचे कंत्राट आपल्याच मर्जीतील कंपनीला मिळावे, यासाठी काही स्थानिक नेत्यांचा आटापिटा चालला आहे.

पुढारी पा.नं. II

# संतांनी रेड्यांना शिकविले, माणसांना नाही

## सुषमा अंधारे यांच्या वक्तव्यावरून वारकरी संतप्त; आंदोलनाच्या रेट्यामुळे मागितली माफी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

रेड्याला शिकवण्याचे सामर्थ्य इथल्या संतांमध्ये आहे म्हणून चमत्कार... अरे, तुम्ही रेड्यांना शिकवले रे, माणसांना कुठं शिकवलं तुम्ही... यासह हिंदू धर्म, संत आणि वारकरी संप्रदायाबाबत ठाकरे गटाच्या शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केलेल्या वक्तव्यांवरून राज्यातील वारकऱ्यांनी संताप व्यक्त केला. त्यानंतर अखेर अंधारे यांनी बुधवारी पत्रकार परिषद घेऊन माफी मागितली. दरम्यान, आळंदीत संतप्त वारकऱ्यांनी सुषमा अंधारेंची प्रतीकात्मक अंत्ययात्रा काढली.

मी कुणाच्याही श्रद्धेआड आलेली नाही; तरीही राजकीय सूडबुद्धीतूनच मला विरोध केला जात आहे. विरोध करण्यामागे वारकरी आघाडीचे काही लोक आहेत. जर माझ्यामुळे संतांच्या, वारकऱ्यांच्या भावना दुखावल्या असतील, तर मी त्यांची माफी मागते, असे सुषमा अंधारे यांनी म्हटले आहे.

त्या म्हणाल्या, मी संत ज्ञानेश्वरांबद्दल काहीही वाकडे बोलले नाही. माझ्या आईच्या संदर्भाने बोलत असताना मी ते विधान केले होते. ज्ञानेश्वरांनी भिंत चालवली, त्यांना माऊली म्हटले गेले. माझे वडील गेले. त्यानंतर माझ्या आईने १५ एकर कोरडवाहू शेतीत काम करून चार भिंतीचे घर चालवले, ती माझ्यासाठी विश्ववंदनीय असली पाहिजे, असे मी म्हटले होते.

२०१९-२० मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी कोरोनामुळे मंदिरे बंद ठेवण्याचा निर्णय घेतला होता. तेव्हा या निर्णयाला विरोध करण्यासाठी सर्वांत पुढे ह.भ.प. गणेश शेटे हेच होते. तेच आता मला विरोध करीत आहेत. आचार्य तुषार

### उदयनराजे नक्कीच राजीनामा देतील : अंधारे

● राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा अवमान केल्याने कोश्यारीविरोधात खासदार उदयनराजे भोसले यांनी आधी रायगडावर आत्मक्लेश आंदोलन केले. आता कोश्यारीविरोधात उदयनराजे आझाद मैदानात मोर्चा काढणार आहेत. दरम्यान, उदयनराजे भोसले यांनी खासदारकीचा राजीनामा द्यावा, अशी मागणी ठाकरे गटाच्या नेत्यांकडून केली जात आहे. त्यात आता ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी उदयनराजे नक्कीच राजीनामा देतील, असे मला वाटते, असे सांगितले.

भोसले यांचाच हा कंपू आहे. जे लोक वारीत कधीच पायी चालले नव्हते, त्या लोकांनी लोकांचे आरोग्य लक्षात न घेता केवळ स्टंट केला होता. माझ्यावर 'ईडी' लावता येत नाही, म्हणून माझे जुने व्हिडीओ व्हायरल केले जात आहेत. मला कशात तरी अडकवण्याचा प्रयत्न होत आहे, असे त्या म्हणाल्या.

### आळंदीत प्रतीकात्मक अंत्ययात्रा

समाजातील संत आणि देवतांचे विडंबन केल्यामुळे सुषमा अंधारे यांच्यावर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी श्रीक्षेत्र आळंदी येथील साईबाबा वारकरी शिक्षण संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प. महेश महाराज मडके-पाटील यांनी आळंदी पोलिस ठाण्यात निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी साईबाबा वारकरी शिक्षण संस्थेच्या प्रांगणापासून आळंदी पोलिस ठाण्यापर्यंत सुषमा अंधारे यांची प्रतीकात्मक अंत्ययात्रा काढून आळंदीत वारकऱ्यांकडून निषेध करण्यात आला.



आळंदीत सुषमा अंधारे यांची प्रतीकात्मक अंत्ययात्रा काढत त्यांच्या वक्तव्याचा निषेध व्यक्त करण्यात आला.